**महाराष्ट्र शासन**
राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई (SIAC)
(प्री.आय.ए.एस.ट्रेनिंग सेंटर)
हजारीमल सोमाणी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस समोर, मुंबई ४०० ००१
दूरध्वनी क्रमांक ०२२-२२०७०९४२ Web : www.siac.org.in ई-मेल : siac१९१५@gmail.com

---

जा.क्र.एसआयएसी/२०२५-२६/सामायिक प्रवेश परिक्षा/ दिनांक- १४/०८/२०२५

## लेखी परीक्षेचा निकाल प्रसिध्द करणेबाबत

राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था, मुंबई व सर्व भारतीय प्रशासकीय सेवा पुर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापुर, छत्रपती संभाजीनगर, अमरावती व नागपूर तसेच महाराष्ट्र शासनाच्या इतर विभागांतर्गत यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (यशदा) संचलित डॉ.आंबेडकर स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन केंद्र, पुणे, पिंपरी चिंचवड महानगरपालिका संचलित सावित्रीबाई फुले अकॅडमी पुणे इ. केंद्रामधील शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता प्रवेशासाठी दिनांक २७.०७.२०२५ रोजी ऑफलाईन सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते. सदर परीक्षेच्या अनुषंगाने या कार्यालयाने संकेतस्थळावर दिनांक **०७.०८.२०२५ च्या सूचनेअन्वये प्रसिदध् केलेल्या अंतिम उत्तर तालिकेनुसार लेखी परीक्षेचा निकाल लावण्यात येत आहे**.

सदर परीक्षेचा निकाल https://formsrec.in/SIAC_CET_2025-2026/?r या लिंकवर उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे. तसेच परीक्षा दिलेल्या विद्यार्थ्यांचा निकाल त्यांच्या वैयक्तिक प्रोफाईल मध्ये सुध्दा उपलब्ध करुन देण्यात आलेला आहे.

प्रोफाईल मध्ये Qualified For Interview असे नमूद असलेले विद्यार्थी या कार्यालयामार्फत होणाऱ्या मुलाखतीसाठी पात्र आहेत. तसेच जे विद्यार्थी मुलाखतीसाठी पात्र नाहीत अशा विद्यार्थ्यांचे गुणदान प्रोफाईल मध्ये उपलब्ध करुन देण्यात आलेले आहेत आणि शेरा (Remark) मध्ये Not Qualified असे नमूद करण्यात आलेले आहे.

**सही/-**
**(डॉ. भावना पाटोळे )**
**संचालक,**
**राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था,मुंबई**
**तथा समन्वयक, एकत्रित सामायिक प्रवेश परीक्षा**